# ।। श्री गजानन महाराज मठ ।।

## घोगळ, मडगांव–गोवा



## प्रार्थना



गजर तव स्तुतीचा आम्ही सदैव करितों स्वामीजी,
जाणतो सर्वजण आम्ही प्रताप तव कृतीचा स्वामीजी;
नमन करितों शतश: टेकूनी तुज चरणीं मस्तक,
नम्र होऊनी करितों मागणी, देऊनी तुज दारी दस्तक.

मनवितों तुज सर्व विधी, हर घडी, हर समयी,
हात जोडतों, आरत्या–भजन गातों, पेटवूनी समई;
राखण आम्हां भक्तांची केलीस तू सदैव स्वामीजी,
जयजयकार तव नामाचा करितों मिळूनी सर्वजण आम्ही.

कीर्ति तुमची महान स्वामीजी, मग्न होतों करण्या सेवा आम्ही.

जप तव नामाचा सदैव असतो, मुखीं आम्हां सर्वांच्या,
यशवंत आम्हां करा स्वामीजी, पाया पडतों आम्ही तुमच्या.

## ।। गण गण गणात बोते ।।

रचना : श्री. सुरेश जयवंत नायक, मुरिडा, फातोर्डा, मडगांव–गोवा. फोन : ०९८५०४७१०८३
रविवार, दिनांक १२–०१–२०१४